॥ सा विद्या या विमुक्तये ॥

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

**SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED**

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

आज़ादी का अमृत महोत्सव

**Phone : (02462) 215525** **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** **Website: srtmun.ac.in**

**Fax : (02462) 215572** **E-mail: dsd@srtmun.ac.in**

जा. क्र. वि.वि.वि./२०२३—२४/२०५ दि. १८/०१/२०२३

प्रति,

मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.

मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले. प्रस्तुत विद्यापीठ.

मा. संचालक, विद्यापीठ उपकेंद्र, पेठ, लातूर.

मा. संचालक, विद्यापीठ उपकेंद्र, परभणी.

मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.

मा. समन्वयक कै.उत्तमराव राठोड आदिवासी संशोधन केंद्र किनवट.

**विषय: प्रजासत्ताक दिन—भारतीय सजग नागरिकत्व जागर अभियान बाबत.**

**संदर्भ :१) महात्मा गांधी सर्वोदय भवन, औरंगाबाद यांचे पत्र दि. १२/०१/२०२४ नुसार**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, दि. २६ जानेवारी २०२४ व प्रतिवर्षी महात्मा गांधी सर्वोदय भवन औरंगाबादच्या वतीने प्रजासत्ताक दिनी सजग नागरिकत्व जागर अभियान हा राष्ट्रीय कार्यक्रम /उपक्रम राबविण्याचे योजिले आहे. तरी महाविद्यालयातील १८ वर्ष पूर्ण करणा—या युवकांना दि. २६ जानेवारी २०२४ रोजी राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम प्रसंगी ज्येष्ठ सामाजिक व राष्ट्रीय कार्यात संक्रिय नागरिकाच्या वतीने सजग नागरिकत्व प्रतिज्ञा देण्यात यावी. असे संदर्भीय संलग्न पत्रानुसार कळविण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करून सहकार्य करावे, ही विनंती.

डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक
विद्यार्थी विकास विभाग

श्री. अजय दर्शनकार, सिस्टीम एक्सपर्ट, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर **प्रजासत्ताक दिन भारतीय सजग नागरिकत्व जागार अभियान** या शीर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home page मधील Students' Development सदराअंतर्गत प्रसिध्द करण्यात यावे.

# महात्मा गांधी सर्वोदय भवन

सिल्क मिल कॉलनी, पैठण रोड, औरंगाबाद.

मो. नं. 9404018282

दि. 12/01/2024

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती

विद्यार्थी विकास विभाग
स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड
आवक क्र. 84 दि. 16/01/2024

OFFICE OF THE PRO-VICE-CHANCELLOR
S.R.T.M.U. Nanded-431 606
Inward No. 0379
Date of Receipt: 16/1/2024
Time: 11=30am Sign.

प्रति,

मा. कुलगुरु,

स्वामी रामानंद तीर्थ, मराठवाडा विद्यापीठ
विष्णुपुरी, नांदेड

**विषय : प्रजासत्ताक दिन - भारतीय सजग नागरिकत्व जागर अभियान.**

**महोदय,**

समाजाचा, राष्ट्राचा सर्वांगीण, गतिमान विकास, नागरिकांची सजगता, जागरूकता, राष्ट्रभक्ती, राष्ट्रीय चारित्र्य, शासकीय योजनेतील सक्रीय सहभाग आदीवर अवलंबुन असतो. जागतिक स्तरावर सर्व क्षेत्रात स्पर्धा सुरू आहे. त्यात टिकून राहण्यासाठी नागरिकांची सजगता, सक्रियता महत्त्वपूर्ण भूमिका निभावते.

शासकीय योजना संलग्न नागरिकांच्या सहभागातून राष्ट्राचा भौतिक, आर्थिक विकास गतिमान होईल. त्यासोबत मानवाचा, नागरिकाचा शारिरीक, मानसिक, सामाजिक, नैतिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक विकास होणे आवश्यक आहे.

भारतीय राज्यघटनेप्रमाणे देशातील युवक आपल्या वयाची 18 वर्षे पूर्ण केल्यानंतर नागरिक होतो. त्याची नागरिकत्व होण्याची प्रक्रिया ही गांभीर्याची, हक्काबरोबर कर्तव्याची जाण देणारी, भारतीय संविधानातील मूल्यांना बांधिल असण्याची, अंगीकारण्याची, संस्कार, धडा, जाणीव करून देणारी आहे. नागरिकत्व ही राष्ट्र जिवनात महत्त्वाची बाब असताना त्यासाठी सामुदायिकरित्या संस्था स्तरावर कुठलाही विधी, कार्यक्रम, उपक्रम नाही. ही मोठी पोकळी व अतार्किक (illogical) बाब आहे. ही बाब गांभीर्याने घेऊन **सजग नागरिकत्व जागर अभियान महात्मा गांधी सर्वोदय भवन, औरंगाबादच्या** वतीने येणारा प्रजासत्ताक दिन गुरूवार, 26 जानेवारी 2024 व प्रतीवर्षी हा राष्ट्रीय कार्यक्रम / उपक्रम राबविण्याचे योजिले आहे.

आपणास विनंती की, आपल्या विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील गुरूवार दि. 26 जानेवारी 2024 प्रजासत्ताक दिनी वयाची 18 वर्षे पूर्ण करणाऱ्या युवकांना महाविद्यालयातील राष्ट्रध्वज वंदन कार्यक्रम प्रसंगी त्यांना ज्येष्ठ सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सक्रिय नागरिकाच्या वतीने **सजग नागरिकत्वाची दीक्षा / प्रतिज्ञा** देण्यात यावी.

या पत्रासोबत प्रपत्रामध्ये नागरिकत्वाची प्रतिज्ञा दिलेली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी अशा प्रपत्राच्या दोन प्रती परिपूर्ण भरून स्वाक्षरी करावी. एक प्रपत्र महाविद्यालयाच्या संग्रही व एक विद्यार्थ्यांच्या संग्रही राहील. प्रतिज्ञा दिल्यानंतर भारतीय राज्यघटनेची प्रास्ताविका भेट देण्यात यावी.

आपल्या कार्यक्षेत्रातील संलग्न महाविद्यालयांना तशा सूचना निर्गमित कराव्यात, ही विनंती.

धन्यवाद.

आपला स्नेहांकित,

ज्ञानप्रकाश मोदाणी

महात्मा गांधी सर्वोदय भवन, औरंगाबाद

BSD/1455
16.1.24
कार्यवाहीसाठी
17.01.24

महाविद्यालयाचे नांव : ..............................

## भारतीय सजग नागरिकत्व जागर अभियान

विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव : ..............................

वर्ग : ..............................

पत्ता : ..............................

..............................

मो. नं. : .............................. Email : ..............................

जन्मदिनांक : .............................. 18 वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक : ..............................

## नागरिकत्वाची प्रतिज्ञा

मी .............................. आजच्या प्रजासत्ताक दिनी राष्ट्रध्वज तिरंग्यास अभिवादन करीत असताना गंभीरपणे प्रतिज्ञा करतो / करते की, माझे वय 18 वर्षे पूर्ण झालेले आहे व मी भारताचा / भारताची नागरिक होण्यास पात्र झालेलो / झालेली आहे.

भारतीय राज्यघटनेतील मूल्ये समाजवाद, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जा व संधीची समानता, व्यक्तीची प्रतिष्ठा, राष्ट्राची एकात्मता, बंधुता यांमध्ये माझी बांधिलकी राहील व त्याच्या संवर्धनासाठी व्यक्तिगत व सामूहिक प्रयत्न करीन. भारतीय लोकशाही अधिक अर्थपूर्ण व प्रगल्भ व्हावी यासाठी मी नागरिक म्हणुन हक्का बरोबर कर्तव्याची जाण ठेवीन.

भारतीय स्वातंत्र्यसंग्राम व हैद्राबाद मुक्तिसंग्रामात हुतात्मा झालेले स्वातंत्र्य सैनिक यांचे त्याग, बलिदान याची सदोदित आठवण ठेवील. त्यांच्या प्रती कृतज्ञभाव जोपासेल.

नवभारत निर्माणात सजग सुजाण नागरिक म्हणून तत्परतेने सहभागी होत राहील. सामाजिक सद्भाव, सलोखा संवर्धनासाठी क्रियाशील राहील. राष्ट्रीय संपत्ती, ऐतिहासिक ठेवा यांचे जतन, संवर्धन करील. पर्यावरण रक्षण व संवर्धनासाठी मी कार्यरत राहील. शाश्वत संतुलित विकासासाठी आवश्यक निसर्गस्नेही जीवनशैली अंगीकारील.

खंडप्राय, विविधतेने नटलेला प्राचीन संस्कृती, अनेक धर्माचे उगमस्थान, जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारतास विश्वमंचावर अहिंसा, सहअस्तित्व, सहकार्य, समन्वय व विश्वशांतीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यासाठी ऐतिहासिक जबाबदारीचे भान मला आहे.

स्थान : स्वाक्षरी -

दिनांक : ( नांव : .............................. )

**टीप** : नागरिकत्वासाठी पात्र विद्यार्थ्यांने प्रपत्र दोन प्रतीत भरावे. एक प्रपत्र महाविद्यालयाच्या व एक स्वत:च्या संग्रहासाठी ठेवावे. स्वत:कडील संग्रहीत प्रपत्र अधूनमधून अवलोकन करीत जावे. या प्रतिज्ञेची आठवण ठेवून मनोनिर्धार कायम राहील असे पहावे.